
Pune, Vol.: 4, 4th issue, July 2023 (Monthly), Price: 100/- Pages: 40

चिकूPiku



जुलै
२०२३

मुखपृष्ठ : गिरीश मालप
आतील मांडणी : OneZeroEight Brandcomm Pvt Ltd.
मुद्रितशोधन : वैशाली कार्लेकर, जुई चितळे
शीर्षक सुलेखन : भक्ती दलाल, अमृता ढगे

Published by:
OneZeroEight Brandcomm Pvt Ltd
Flat No. 10, Narayan Complex,
2nd Floor, Hingne Kh.,
Sinhagad Road, Pune 411 051

Printed by:
Atharva Print Creation
S. No. 91/1, Plot No. 8,
Tulshibaugwale Colony,
Sahakarnagar, Pune 411 009


For subscription:
Visit www.chikupiku.com
Or call on 9172136478

प्रिय आई-बाबा

पाऊस - पाणी हा विषय तसा नेहेमीचा, पण त्याची जादू न संपणारी आहे. पाण्यात खेळायची भारी गंमत मुलांना वाटते. अंघोळ करतानासुद्धा त्यांचा खेळ सुरू असतो. पावसाळ्यात खुलणारा निसर्ग, थेंबांचं, ढगांचं, नदीचं प्रत्येक वेळी दिसणारं निराळं रूप ही सगळी पाण्याची जादू दाखवण्याचा प्रयत्न अंकात केला आहे. पावसासारखीच या अंकातली चित्रंही सुंदर झालेली आहेत. वेगवेगळ्या शैलीतली ही चित्रं मुलांसोबत नक्की बघा. गोष्टींमध्ये नाहीत अशा अनेक गमती या चित्रांमध्ये सापडतील. पाण्याचा स्वभाव दाखवणारे भन्नाट प्रयोग 'हातांची जादू' सदरात दिलेले आहेत. तेही आवर्जून करून बघा.
निसर्गाशी मुलांची नाळ जुळवून ठेवता यावी यासाठी जाणीवपूर्वक काही गोष्टी आपल्याला करता येतील. आसपास दिसणारी झाडं, पक्षी, किडे यांचं मुलांबरोबर आपणही निरीक्षण करायला हवं. त्यांच्याविषयी बोलत राहायला हवं. ऊन-वारा-पाऊस यांचा प्रत्यक्ष अनुभव घ्यायला हवा. उत्साह, चौकस वृत्ती, संवेदनशीलता निसर्गाच्या जवळ जाऊन नक्कीच वाढतात... तशी संधी आपण मुलांना द्यायला हवी.

अमृता कावणकर
Editor & Co-Founder

जुई चितळे
Co-Editor





पावसाळ्यात दिसणारे हे प्राणी, पक्षी, कीटक अंकात पसरले आहेत. ते शोधून काढ. प्रत्येकाची संख्या किती आहे ते मोजून चौकटीत लिही. जसं की दोन कोकीळ पक्षी पान नं. दहावर आहेत. त्यामुळे या चित्रात कोकीळ पक्ष्याच्या चौकटीत 2 आकडा लिहिला आहे. तुझ्या सगळ्या चौकटी भरल्या की या चित्राचा फोटो आम्हाला नक्की पाठव.



'मूल' प्रश्न

मुलांनी योग्य पद्धतीने वागावं यासाठी काही पालक मुलांशी अबोला धरतात. मुलांनी हाक मारली तरी बघायचं नाही. त्यांनी बोलण्याचा प्रयत्न केला तरी बोलायचं नाही. न बोलणं हा एक मार्ग असतो हे खरंय. पण चार-पाच वर्षांच्या मुलांसाठी राग+अबोला हा पाचेक मिनिटांपेक्षा जास्त असू नये. नाही तर, आई / बाबा का रागावले आहेत, आपलं नक्की काय चुकलं आहे आणि जे चुकलं आहे, त्याचं आता करायचं तरी काय, याची योग्य दिशा मिळत नाही. मूल स्वतः काहीतरी तर्क लावून उत्तर शोधतं. ते बरोबर असेलच असं नाही. त्यापेक्षा काय झालं आहे आणि काय करायला हवं आहे, हे स्पष्टपणे बोलून मार्ग काढणं हे जास्त सोपं आहे.

- डॉ. श्रुती पानसे

नदीशी गप्पा

कविता - पार्थ जोशी | चित्र - शुभम लखेरा



नदीमध्ये पाय सोडून, मी रोज बसतो
नदीशी मनापासून, भरपूर गप्पा मारतो

पायांना माझ्या लागतं, पाणी गार गार
पाहतच राहतो मी, नदी निळीशार

तुझ्यामुळेच आम्हाला, खूप पाणी मिळतं
झाड मोठं वाढतं, आणि फूल फुलतं

काय आहे सांग ना, तुझ्या तळाशी?
गुपित तेव्हा नदी सांगते, हळूच कानाशी

तिच्या तळाशी आहेत, चमचमते मोती
आणि काठावर आहे, मऊ मऊ माती

मी म्हटलं नदीला, तू नाहीस का दमत?
दिवसा रात्री, क्षणोक्षणी, राहतेस वाहत!

पावसाळ्यात तुझं वजन, केवढं वाढतं
उन्हाळ्यात अचानक, कुठे निघून जातं?

बोलता बोलता नदी मला, शंख शिंपले देते
नदी माझी मैत्रीण, मला रोज रोज भेटते




फिशिरा
फिशिरा आणि तिचे मित्रमैत्रिणी गप्पा मारत होते.
बोलता बोलता मध्येच ती इकडून तिकडे सुळसुळ पोहत होती.
अचानक तिच्या मनात एक विचार आला. ती सगळ्यांना म्हणाली,
गोष्ट - जुई चितळे | चित्र - ओंकार महामुनी
एवढ्या सगळ्या पाण्याचा मोठा समुद्र नसता तर आपण कुठे राहिलो असतो?


आपण प्राण्यांसारखे जमिनीवर राहायला लागलो तर? मला आठ आठ पाय आहेत. मी आरामात जमिनीवर चालू शकेन. तुम्हाला पण पाय फुटले तर कसे दिसाल सगळे?
पाय फुटलेली फिशिरा, टम्पू, किरो यांची कल्पना करून सगळे हसायला लागले.

Audio story available
on www.chikupiku/audio
or Scan the QR Code

पंख फुटून आपण पक्ष्यांसारखे आकाशात उडायला लागलो तर? मी आणि फिशिरा तर फुलपाखरू किंवा छोटे पक्षी म्हणून छान दिसू. पण तुमचं काय?



मोठा ढोला टम्पू कसाबसा उडतोय आणि ऑक्टीची आठ पाय आणि शिवाय दोन पंख सांभाळताना गडबड होते आहे या कल्पनेने ते अजूनच जोरात हसायला लागले.





टम्पू म्हणाला, **''त्यापेक्षा सरपटत जाणारे प्राणी झालो तर बरं पडेल मला.''**

फिशिरा म्हणाली, **''किंवा लांब शेपूट आली आपल्याला तर? शेपूट फांदीवर लटकवून झाडावर राहायला भारी मज्जा येईल!''**

तेवढ्यात आईबाबांची हाक ऐकू आली. सगळे जण पोहत पोहत घरी जायला निघाले पण त्यांच्या मनातून मात्र अजूनही कोणी चालत, कोणी उडत, कोणी सरपटत तर कोणी लटकत होते.

तुला फिशिरासारखा मासा होऊन पाण्यात राहायला आवडेल का? इथे तसं चित्र काढून बघ.



My Blue Raincoat

Poem - Rasika Thosar
Illustration - Yogita Dhote

The rainy season is here
There is nothing to fear

As raindrops come rushing down
I already have my bright blue gown

Round buttons and a nice big cap
Drops keep splashing tap tap tap

Water drips drips on my nose
The mud keeps sticking to my toes

Friends dash out
to play in the rain
The coat gets removed
in less than ten



झाडी गोडी

गोष्ट - केतकी घाटे | चित्र - अनघा कुसुम

ऑर्किड – आषाढ अमरी

मीराला टेकडीवर जायला आवडायचं. आज मीरा सारिकाताईबरोबर टेकडीवर फिरायला गेली होती. टेकडी बघून मीरा म्हणाली, ''किती हिरवीगार झालीये टेकडी. उन्हाळ्यात तपकिरी–पिवळी होती. पाऊस सगळं हिरवं आणि स्वच्छ करतो.'' चालत चालत ते एका सपाटीवर पोहोचले. तिथे कित्तीतरी छोटी छोटी पांढरी फुलं फुललेली होती.

मीरा म्हणाली, ''सारिकाताई, कित्ती सुंदर आहेत ना ही फुलं? जमिनीवर चांदण्याच पसरल्या आहेत असं वाटतंय!'' ताई म्हणाली, ''ह्या फुलांचं नाव आहे 'आषाढ अमरी'! ही स्पेशल फुलं आहेत! इंग्रजीत त्यांना 'ऑर्किड' असं म्हणतात. त्यांना अमरी का म्हणतात माहितीये? कारण ही झाडं आपली आपण मरत नाहीत. अ-मरी म्हणजे न मरणारी. पावसाळा सुरू झाला आणि माती ओलीकंच झाली की जमिनीवरची वेगवेगळ्या प्रकारची ऑर्किड फुलतात. त्यातलंच एक आषाढ अमरी. व्हॅनिला आईस्क्रीम आवडतं ना तुला? व्हॅनिला नावाचं एक ऑर्किड आहे. व्हॅनिला ऑर्किडच्या फळांचा अर्क/इसेन्स काढून तो आईस्क्रीममध्ये वापरतात.''

''ओह वॉव, म्हणजे व्हॅनिला आईस्क्रीमला ऑर्किडमुळे यम्मी चव येते.'' मीरा म्हणाली. मीरा खाली वाकून ऑर्किडची फुलं बघायला लागली. एक फूल हातात घेत ती म्हणाली, ''कित्ती गमतीदार आहेत ही आषाढ अमरीची फुलं, त्यांना हात आणि पाय आहेत असं वाटतंय.'' ताई म्हणाली, ''हो... अगं काही ऑर्किडची फुलं तर सुंदर पऱ्यांसारखी दिसतात. तुला माहितीये, दोन प्रकारचे ऑर्किड असतात; एक जमिनीवर, मातीत वाढणारे आणि दुसरे झाडाच्या फांदीवर वाढणारे. हे पांढरं आषाढ अमरी ऑर्किड जमिनीवर वाढतं.





'सीतेची वेणी' नावाचं एक ऑर्किड आहे. ते उंच झाडाच्या फांद्यांवर वाढतं. त्यांना माती लागत नाही.'' ''मातीशिवाय कशी वाढतात ती?'' मीराने विचारलं.
''हवेतला ओलावा शोषून ते वाढतात. ज्या झाडावर ते वाढतात त्याला ते काहीही त्रास देत नाहीत. फक्त त्यांच्या फांद्यांचा आधार घेतात. पावसाळ्यात कोकणात सीतेच्या वेणीने लगडलेली झाडं दिसतात. झाडांनी गजरे घातले आहेत असं वाटतं''

मीराने प्रश्न विचारला, ''सारिकाताई, फुलांच्या गुच्छातसुद्धा ऑर्किड वापरतात ना?''
''हो, ऑर्किडच्या पाकळ्या चांगल्या जाड असतात. त्यामुळे फुलं लवकर कोमेजत नाहीत. हे बघ या फुलांमधला मकरंद घ्यायला छोटे कीटक आलेत. चल बघू या त्यांना.'' ताई म्हणाली. छोटी मीरा आषाढ अमरीची फुलं बघण्यात गुंगून गेली.



निसर्गविषयक बुद्धिमत्ता

पावसाळ्यात तुमच्या घराजवळच्या टेकडीवर जाऊन ऑर्किडची फुलं नक्की बघून या. पुण्यात कात्रज टेकडीवर ती बघायला मिळतील. निसर्गविषयक बुद्धिमत्तेचे अनुभव मुलांना मिळावे, निसर्गाविषयी आपुलकी वाटावी याकरता निसर्गाच्या जवळ जायला हवं.

पाऊस पाणी

- तनया देसाई, अपूर्वा घुले



चित्रडोकू

ही चार चित्रं नीट पाहा. प्रत्येक ठळक चौकोनात यातलं कुठलं चित्र हरवलं आहे? ते काढ.

आगळेवेगळे बेडूकदादा


- बेडकाचं अंग तुझ्या सगळ्यात आवडत्या रंगाने रंगव.
- त्याच्या अंगावरचे ठिपके तुझ्या आईच्या आवडत्या रंगाने रंगव.
- त्याची जीभ आजोबा किंवा आजीच्या आवडत्या रंगाने रंगव.
- पान बाबांच्या आवडत्या रंगाने रंगव.





ठिपक्यांची गोगलगाय

ठिपक्यांची गोगलगाय काढून बघ.
छान रंगव. अशी रांगोळीसुद्धा
काढून बघ.





नक्षीदार पाणी

नदीच्या या लाटांमध्ये छानशी नक्षी काढ.
होड्या, कमळंसुद्धा काढ.



ढगू

भावानुवाद - प्रतीक्षा खासनीस
चित्र - पूर्वा बापट

मोठे मोठे ढग आकाशातून पुढे-पुढे चालले होते. छोटा ढगू मात्र मागेच राहिला. ढगू खाली-खाली येत होता. तो इतका खाली आला की, आता घरांना, झाडांना हात लावू शकत होता.



वाऱ्यासोबत उडणारे बाकीचे ढग पार पुढे निघून गेले.
ते गेलेले पाहून मग छोट्या ढगाने आपले हात-पाय पसरले आणि आकार बदलला.

तो **मेंढीसारखा** दिसायला लागला. आकारांचा हा खेळ त्याला फार आवडला.





त्याने पुन्हा हात पाय पसरले
आणि तो पक्ष्यासारखा
दिसायला लागला.
आकाशात कित्तीतरी **पक्षी**
त्याला रोज दिसायचे.

आता तो मोठ्ठ्या **माशासारखा**
दिसत होता.
आकाशातून उडताना भल्यामोठ्या
समुद्रात पोहणारे मासे त्याने
पाहिले होते.



आता तर ढगूने **झाडासारखा** आकार घेतला.

एका जागी, शांतपणे उभी राहून आजूबाजूला बघणारी झाडं त्याला फार आवडायची.

ढगूला आता उड्या मारायच्या होत्या, मग तो एक **छोटा मुलगा** बनला.

उड्या मारत पळणारी मुलं बघायला त्याला भारी आवडायचं.



बराच वेळ झाला होता. पुढे गेलेले बाकीचे ढग छोट्या ढगूला शोधत-शोधत पुन्हा मागे आले.

"ढगू, कुठे आहेस तू?" ते जोरजोरात हाका मारत होते.
त्यांच्या हाका ऐकून छोटा ढगू त्यांच्यात जाऊन उभा राहिला.
मग त्या सगळ्यांनी एकमेकांना घट्ट मिठी मारली.

एक मोठा ढग तयार झाला.

आणि जोरजोरात पावसाला सुरुवात झाली.

(एरीक कार्ल लिखित 'द लिटिल क्लाऊड' या गोष्टीचा भावानुवाद)

कागदाचे आकार कापून, त्यांची रचना करून ही सुंदर चित्रं तयार केली आहेत.
तू पण अशी कोलाज-चित्रं करून बघ आणि आम्हाला फोटो पाठव. 9172136478

रिक्षा

कविता आणि चित्र - वसीमबारी मणेर



रात्र सरली
माथ्यावरली

सामान आहे खूप
उरला नाही हुरूप

घराची वाट धरावी
आता रिक्षाच करावी!

तर म्हणतो कसा रिक्षावाला
न बघता माझ्या तोंडाला





"दीडपट भाडे
द्यावे लागेल
एमटी रीटन
यावे लागेल"

गरकन गोल
फिरवून मान
पायाने डावा
खाजवून कान

चोचीतला उंदीर
पायात मी धरला
पंखाने दुसऱ्या
मीटर टाकला

"बुरूज फुटका
उन्हाचा चटका
पडका वाडा
बकुळीचा सडा
सुनसान गल्ली
तिथे राहतो हा वल्ली"

चला!!!

रिक्षा मिळत नाही म्हणून
कोण म्हणते रात्री?
अहो सविस्तर सांगा ना पत्ता!
ते येतातच!
मी देतो ना खात्री!!!



चित्रगप्पा

चित्रात अनेक छोटया गोष्टी लपल्या आहेत. दुकानदार काय करतोय? रिक्षावाले काका काय बरं म्हणत असतील? चित्रात एक छोटा मुलगा आणि कुत्रा दिसतोय, त्यांची एखादी गोष्ट तयार होईल का? मुलाचं नाव काय असेल? आणि कुत्र्याचं काय बरं ठेवू या? अशा कितीतरी गप्पा गोष्टी या चित्रातून तयार होतील.



चित्रात 'क' अक्षरापासून सुरु होणाऱ्या ८ वस्तू आहेत. शोध बरं.

१. कबुतर २. कावळा ३. कागद ४. कप ५. कुत्रा ६. केळी
७. काठी ८. K J Sweets

चित्र - शुभम लखेरा

Nature and मी

गोष्ट - गिरीश जठार | चित्र - श्रीनिवास बाळकृष्ण



पेरते व्हा! पेरते व्हा!

छोटा गोलू आबांबरोबर अंगणात बॅट–बॉल खेळत होता. तितक्यात एक पक्षी झाडावर येऊन बसला आणि ओरडायला लागला. गोलू म्हणाला, **''आबा, हा पक्षी बघा कसा ओरडतोय.''**

आबा म्हणाले, ''अरे, हा तर पावश्या आहे. हा ओरडायला लागला की पावसाळा सुरू होतो. म्हणून त्याला पावश्या म्हणता. तो काय ओरडतोय नीट ऐक. तो म्हणतोय 'पेरते व्हा! पेरते व्हा!' गमतीने असं म्हणतात की तो शेतकऱ्यांना ओरडून सांगतो की, 'पेरते व्हा! पाऊस येतोय. बी पेरणीची तयारी करा.' त्याच्या या आवाजामुळे या पावश्याला 'पेरते व्हा' नावानेसुद्धा हाक मारतात.





हा पावश्या मोठा वस्ताद असतो. पावसाळ्यात त्याला अंडी घालायची असतात. पण तो स्वतःचं घरटं बांधत नाही. तो सातभाई पक्ष्यांना फसवून त्यांच्या घरट्यात अंडी घालतो. या सातभाईंच्या कुटुंबात सहा–सात सातभाई पक्षी एकत्र राहतात. सगळे मिळून एक टुमदार घरटं बांधतात. त्यात मादी म्हणजे female सातभाई अंडी घालतात. आलटून पालटून हे सातभाई अंडी उबवतात. या सातभाईंच्या घरट्यातच पावश्याला लपूनछपून अंडी घालायची असतात. मग तो एक आयडिया करतो.


हा पावश्या 'शिक्रा' नावाच्या शिकारी पक्ष्यासारखा दिसतो. सातभाई शिक्राला घाबरतात. पावश्या, शिक्रा पक्षी असल्याचं नाटक करतो. नर म्हणजे male पावश्या जोरात ओरडत, पंख फडफडवत सातभाईंच्या घरट्यावरून घिरट्या घालतो. सातभाईंना वाटतं शिक्रा पक्षी आलाय त्यांची शिकार करायला. ते घाबरून उडून जातात. घरट्यात अंडी तशीच असतात. मग मादी पावश्या पक्षी पटकन उडत जाते आणि सातभाईंच्या घरट्यात चटकन अंड घालते. त्यांच्या अंड्याचा रंगसुद्धा सातभाईंच्या अंड्यासारखाच असतो. मस्त निळा. थोड्यावेळात सातभाई घरट्यात परत येतात. त्यांना कळतसुद्धा नाही की त्यांच्या घरट्यात पावश्याचं अंड आहे. सातभाईंच्या कुटुंबात पावश्याचं पिल्लू मोठं होतं. सातभाईच त्याला खाऊपिऊ घालतात. एकदा का उडता यायला लागलं की मग हा पावश्या, सातभाई कुटुंबाला टाटा करून उडून जातो.''

''कसलं भारी...म्हणजे सातभाईच पावश्या पक्ष्याचे आई–बाबा होतात.'' पावश्याकडे बघत गोलू म्हणाला. पुन्हा पावश्या 'पेरते व्हा! पेरते व्हा!' ओरडायला लागला आणि थेंब थेंब पाऊस सुरू झाला.

या फोटोत जो उजवीकडचा मोठा पक्षी आहे तो म्हणजे पावश्याचं पिल्लू आहे. त्याच्यापेक्षा छोटा सातभाई त्याला भरवतोय. त्याला ते त्याचंच पिल्लू वाटतंय.
आहे की नाही गंमत!



हॅलो, मी ब्रेनी



प्रत्येकाच्या मेंदूत आठ वेगवेगळ्या बुद्धिमत्ता असतात. काही बुद्धिमत्ता ठळक तर काही फिकट असतात. एखादं मूल चित्रांमध्ये रमतं तर एखादं खेळात. काहींना अभ्यास आवडतो तर काहींना गाणी म्हणायला, नाचायला आवडतं. एखादं मूल अबोल असतं तर काही मुलं कोणाशीही सहज संवाद साधू शकतात. निरीक्षणांमधून आणि मुलांना वेगवेगळे अनुभव देऊन त्यांच्यात कुठली बुद्धिमत्ता ठळक आहे हे शोधून काढता येईल.

चिकूपिकूच्या अंकांमधून या आठ बुद्धिमत्तांचे सोपे अनुभव देण्याचा प्रयत्न आम्ही करतो. या बुद्धिमत्तांविषयी आणखी माहिती करून घेऊन आपला आणि आपल्या मुलांचा कल कुठल्या बुद्धिमत्तांमध्ये आहे हे शोधून काढता येईल.

- डॉ. श्रुती पानसे


scan the above QR code
for more information

चिमणी चित्रं

षट्कोनी आकार काढून हे मधमाश्यांचं पोळं पूर्ण कर. प्रत्येक षट्कोनात एक किंवा जास्त मधमाश्या काढ आणि मधाच्या रंगाच्या पिवळ्या रंगछटांनी चित्र मस्त रंगव.

- आभा भागवत





पालकांसाठी

एखादा आकार लक्षात ठेवून जमेल तसा काढायला मुलांना मजा येते. रंगाच्या विविध छटा वापरून चित्र सुंदर होतं आणि नकळत मुलं 'सौंदर्य कसं दिसतं' हे शिकतात.




माऊ आणि बाऊ

गोष्ट - देवयानी खरे | चित्र - भक्ती दलाल

माऊला नखं कुरतडायची घाणेरडी सवय लागली होती.



पण माऊचा हात काही ऐकेना. बोटं तोंडात जायची आणि कटकटकट नखं कुरतडायला सुरुवात...
बाऊ मात्र खूश होता.



खेळताना साहिलदादाने माऊला नखं खाताना पाहिलं. तो म्हणाला,

''ईऽऽऽ गं माऊ, नखं नको खाऊस. नखांमध्ये घाण असते. मायक्रोस्कोपमधून नखं पाहिली तर त्यात वळवळणारे बाऊ दिसतात. ते बाऊच तू खाते आहेस. ईऊ...तो बाऊ पोटात गेला की मग उलट्या होतात, नाहीतर ताप येतो किंवा सारखी शी होते. तुला बाऊ खायला आवडतो का? आवडत असेल तर खा!''






माऊ घाबरून म्हणाली, ''नक्को नक्को, मला नाही आवडत आजारी पडायला. मी आता कध्धीच नखं खाणार नाही.'' माऊने आईकडून नखं नीट कापून घेतली. हात स्वच्छ धुतले. साहिलदादा म्हणाला, ''गुड गर्ल माऊ!''




बाऊचा प्लॅन फसला...
माऊ लागली हसायला
आणि बाऊ लागला रडायला!

कुठला पतंग फुलापर्यंत पोहचेल?
रस्त्यावरून बोट फिरवून शोधून काढ.



पुढचं चित्र काय असेल?
तू काढशील का?



तू कधी नदीकाठी किंवा समुद्रकिनारी फिरायला गेली/गेला आहेस का? तिथल्या पाण्याचा रंग कसा दिसतो?

समुद्राचं पाणी निळं दिसतं पण ओंजळीत घेतलं तर त्याचा रंग निळाच दिसतो का?

Science सैर

गोष्ट - शिवानी पेठे
चित्र - सानिका देशपांडे


वेगवेगळ्या ठिकाणी पाण्याचा रंग वेगवेगळा असतो का? तुला काय वाटतं?

एका काचेच्या ग्लासमध्ये नळाचं पाणी भर, कुठला रंग आहे बरं या पाण्याला?

पाण्याच्या रंगाची गोष्ट आज आपण ऐकणार आहोत.



खूप वर्षांपूर्वी तिरुचिरापल्ली गावात चंद्रशेखर व्यंकट रमण नावाचा एक मुलगा राहायचा. हा छोटा रमण भरपूर पुस्तकं वाचायचा. पुस्तकांमधून खूप गोष्टी तो शिकला. छोटे छोटे प्रयोग करून बघायला लागला. सहावीत असतानाच त्याला दहावीचा अभ्यास यायचा. मग काय छोटा रमण सहावीत असतानाच दहावीची परीक्षा पास झाला. आता तो कॉलेजचा अभ्यास करायला लागला. फक्त पंधरा वर्षांचा असताना त्याने कॉलेजमधल्या सगळ्यात मोठ्या परीक्षेत (पोस्टग्रॅजुएशनमध्ये) गोल्ड मेडल मिळवलं.



हाच रमण म्हणजे शास्त्रज्ञ सी. व्ही. रमण. पुढे ते कलकत्ता महाविद्यालयामध्ये (कॉलेजमध्ये) मुलांना शिकवायला लागले. घरी ते नेहेमी वेगवेगळे प्रयोग करत असायचे. एकदा सी. व्ही. रमण एका कार्यक्रमासाठी युरोपात गेले होते. पूर्वी विमानं नव्हती. लोक मोठ्या मोठ्या जहाजातून दुसऱ्या देशात जायचे. खूप दिवस प्रवास चालायचा. युरोपातून भारतात परत येताना सी. व्ही. रमण जहाजातून समुद्राचं निळंशार पाणी बघत होते. त्यांना प्रश्न पडला;

समुद्राचं पाणी निळं का बरं दिसतं?

त्या काळात लोकांना वाटायचं की आकाशाचं प्रतिबिंब पाण्यात दिसतं. आपण आरशात बघतो तसं आकाश पाण्यात दिसतं. म्हणून पाणी निळं दिसतं. सी. व्ही. रमण यांना आकाशाचा रंग पाण्यात दिसतो हे मान्य नव्हतं. त्यांनी जहाजावरच प्रिझम आणि त्यांच्याकडे असलेल्या काही वस्तू वापरून प्रयोग सुरू केले. समुद्राच्या पाण्याच्या निळ्या रंगाचं गुपित त्यांना शोधायचं होतं. भारतात आल्यावर त्यांनी आणखी अभ्यास केला. नवीन प्रयोग करून पाहिले. त्यांच्या डोक्यातून उन्हात चमकणारं समुद्राचं निळं पाणी जातच नव्हतं. अखेरीस समुद्राचं पाणी निळ्या रंगाचं का दिसतं याचा शोध सी. व्ही. रमण यांनी लावला.



सूर्य प्रकाशात इंद्रधनुष्याचे सात रंग असतात. तांबडा, नारंगी, पिवळा, हिरवा, निळा, पारवा, आणि जांभळा. आपल्याला नुसत्या डोळ्यांनी ते वेगवेगळे असे दिसत नाहीत. सूर्याचा प्रकाश जेव्हा पाण्यावर पडतो तेव्हा तो पाण्यातून आरपार जातो आणि हातांची ओंजळ, ग्लास यांवर आपटून परावर्तित म्हणजे रिफ्लेक्ट होऊन येतो. तेव्हा पाणी पारदर्शक दिसतं. पण जेव्हा खूप खूप जास्त पाणी असतं तिथे प्रकाश पूर्ण रिफ्लेक्ट होत नाही. अशा वेळी प्रकाशातले बाकीचे रंग पाण्यात बरेच शोषले जातात आणि फक्त निळा रंग पाण्याच्या कणांवरून जास्त विखुरला जातो. त्यामुळे आपल्या डोळ्यांना समुद्राचा रंग निळा दिसतो.



सी. व्ही. रमण यांनी हा महत्त्वाचा शोध लावला. त्यासाठी त्यांना भौतिक शास्त्रातलं प्रथम नोबेल पारितोषिक मिळालं. सी. व्ही रमण यांची आठवण ठेवण्यासाठी आपण २८ फेब्रुवारीला राष्ट्रीय विज्ञान दिवस साजरा करतो.



व्यक्तिअंतर्गत बुद्धिमत्ता

विचार करून, स्वतःशी संवाद साधून, निरनिराळे प्रयोग करून बघणं या बुद्धिमत्तेमुळे साध्य होते. आपलं सभोवताल विज्ञानाने व्यापलेलं आहे. मुलांपर्यंत हा विचार पोहोचण्यासाठी हे सदर आहे.

चिकू Piku

गोष्ट - अमृता कावणकर
चित्र - भक्ती दलाल




जोराचा पाऊस सुरु झाला.चिकू मोठ्ठा आऽऽऽ करून पाणी प्यायला लागला.
येतंय का पिता?
वुफ! प्यायल्यासारखंच वाटत नाहीये पाणी.
कसं पिऊ मी पावसाचं पाणी?
आयडिया
वुफ...वुफ... वम वम

थेंबांचं गाणं

कविता - विद्याधर शुक्ल | चित्र - भार्गव कुलकर्णी



थेंब थेंब नाचत आले
नाचत आले
टप टप टप...
टप टप टप

पाऊस आला जोराचा
जोराचा
धो धो धो...
धो धो धो

छपरावर वाजू लागले
वाजू लागले
अडम तडम...
अडम तडम

काचेवर ओघळले
ओघळले
भुळ भुळ भुळ...
भुळ भुळ भुळ

वाटेवर ओहोळ आले
ओहोळ आले
खळ खळ खळ...
खळ खळ खळ

नदी कशी गाऊ लागली
गाऊ लागली
झुळ झुळ झुळ...
झुळ झुळ झुळ

पाणी असे गाऊ लागले
गाऊ लागले

टप टप टप धो धो धो
अडम तडम... भुळ भुळ भुळ
खळ खळ खळ झुळ झुळ झुळ
खळ खळ खळ झुळ झुळ झुळ



चित्रात दिसणाऱ्या पावसातल्या गमती तू खऱ्या खऱ्या पाहिल्या आहेस का? चित्राविषयी आईबाबांशी गप्पा मार.

संगीतविषयक बुद्धिमत्ता

सोप्या चालीतली गाणी म्हणायला मुलांना आवडतात आणि लक्षातही राहतात. गाणी ऐकून, म्हणून या बुद्धिमत्तेचे अनुभव मुलांना देता येतील.

घुराव घुरूक

संकल्पना व चित्र - हबीब अली

एका जंगलात एक वाघोबा राहायचा. नदीकाठी त्याची छोटीशी गुहा होती. वाघोबा रोज सकाळी उठायचा. नदीवर जाऊन लपलप पाणी प्यायचा. शी-शू करून मस्त फ्रेश व्हायचा. हात पाय ताणून व्यायाम करायचा आणि मग शिकारीला जायचा. खाऊन-पिऊन गुहेत परतायचा आणि मस्त ताणून द्यायचा.

पावसाळ्यात जंगलात धो धो पाऊस पडायचा. वाघोबाला पावसात भिजायला बिलकुल आवडायचं नाही. एके दिवशी असाच जोरदार पाऊस सुरू होता. दोन दिवस झाले...तीन दिवस झाले...चार दिवस झाले...पाऊस काही थांबेना. वाघोबा गुहेच्या तोंडाशी बसून पावसाकडे बघत लोळत होता. तितक्यात तिथे एक बेडूक आला. बेडूक पावसात भिजत डराव डुरूक... डराव डुरूक... ओरडत होता.

''किती ओरडता रे तुम्ही बेडूक पावसाळ्यात? एक तर हा पाऊस थांबायचं नाव घेत नाहीये आणि त्यात तुझं हे घुराव घुरुक.''

''अरे, डराव डुरूक असतं ते!'' बेडूक हसत म्हणाला. ''काही का असेना तू शांत बस. नाहीतर दुसरीकडे जाऊन ओरड. कधी थांबणार हा पाऊस? वैताग आलाय!''



Audio story available
on www.chikupiku/audio
or Scan the QR Code

बेडकाने विचारलं, ''वाघोबा, तुला पोहता येतं ना?'' ''मी काय बेडूक आहे का मासा आहे पाण्यात पोहायला? मी फक्त पाणी पितो.'' असं म्हणून त्याने मोठी जांभई दिली आणि तोंड तिकडे फिरवून झोपी गेला.

थोड्या वेळाने अचानक वाघोबा खडबडून जागा झाला. डोळे उघडून बघतो तर काय गुहा पाण्याने भरून गेली होती. पचॅक पचॅक हात पाय मारत वाघोबा गुहेतून बाहेर आला. तितक्यात एक मोऽऽऽठी लाट आली आणि वाघोबाला नदीत घेऊन गेली. नाकातोंडात पाणी गेलं होतं. काय करावं सुचेना.

वाघोबा वेडेवाकडे हात पाय मारत मोडकं-तोडकं पोहायला लागला. तितक्यात तिथे बेडूक आला. ''वाघोबा... वाघोबा माझ्याकडे बघ. मी हलवतोय तसे हात पाय हलव.'' वाघोबा बेडकाची कॉपी करायला लागला.

हात ताणून बाजूला बुळुक...आणि मग जोडून पुढे . पाय फाकवून लांब...आणि परत जवळ.

बेडकाचा पोहण्याचा फॉर्म्युला त्याच्या लक्षात आला. ''बेडक्या, हे बघ जमतंय मला.'' पोहत पोहत दोघे पलीकडच्या किनारी पोहोचले. वाघोबा बाहेर आला. अंग झटकलं. पाऊस थांबला होता. स्वच्छ ऊन पडलं होतं. बेडूक म्हणाला, ''मला माहीत होतं पूर येणार आहे, म्हणून तर तुला विचारलं ना पोहता येतं का?''

''धन्यवाद मित्रा! पण आता मला नीट पोहता येतंय. तेही बेडूक स्टाईलने.

घुराव घुरुक...
घुराव घुरुक...यो!''

भाषिक - वाचिक बुद्धिमत्ता

लहान मुलांचा भाषा विकासाचा वेग सर्वाधिक असतो. गोष्टींमधून नवीन शब्द, वाक्प्रचार मुलं सहज शिकतात आणि वापरायलाही लागतात.



हाताची जादू

- डॉ. विदुला म्हैसकर

हा अंक तुझ्या हातात येईपर्यंत पाऊस सुरू झाला असेल आणि त्याबरोबर तुझी धमाल-मस्तीसुद्धा. पाण्यात खेळायची मज्जाच वेगळी! पाण्याचा स्वभावही एकदम खास आहे. यालाच धरून आज आपण पाण्यासोबत तीन मजेशीर खेळ करू या, अगदी जादूच वाटतील असे.

पाण्याला चिकटणारं कार्ड

ह्या जादूसाठी तुला लागेल काचेचा ग्लास, दोन-तीन नाणी, खेळण्याच्या पत्त्यांमधलं एक कार्ड आणि पाणी.

चित्रात दाखवल्यासारखं कार्ड रिकाम्या काचेच्या ग्लासवर ठेव. मग कार्डच्या ग्लासाबाहेर आलेल्या भागावर एक नाणं ठेवायचा प्रयत्न कर. नाही जमत ना? नाणं आणि कार्ड दोन्ही पडतं.





आता ग्लास अगदी काठोकाठ पाण्याने भर त्यावर कार्ड ठेव. असं करताना थोडं पाणी सांडेल. आता जर तू नाणं कार्डवर ठेवायचा प्रयत्न केलास तर एक काय चांगली ३-४ नाणी तू सहज कार्डवर ठेवू शकशील!




तुला काय वाटतं पाण्याला कार्ड चिकटून बसतंय का?

चित्र- अदिती गुणाजी



गायब होणारं नाणं

ह्या जादूसाठी तुला लागतील दोन सारखे काचेचे ग्लास, दोन नाणी (१, २ किंवा ५ ची घे १० चं नाणं नको) आणि पाणी.



एका ग्लासच्या आतमध्ये नाणं टाक आणि दुसरं नाणं टेबलावर ठेवून त्यावर दुसरा ग्लास ठेव. दोन्ही नाणी ग्लासमधून तुला दिसतील.



आता दोन्ही ग्लासमध्ये पाणी भर. काय झालं? ज्या ग्लासच्या आत नाणं होते, ते दिसतय. पण जे नाणं ग्लासच्या खाली ठेवलं होतं ते दिसत नाही!

कुठे बरं गायब झालं ते?

दिशा बदलणारे मासे

ह्या जादूसाठी तुला लागेल एक कागद, काचेचा ग्लास आणि पाणी.



कागदावर तीन माशांचं चित्र काढ. हा कागद ग्लासच्या उंचीपेक्षा थोड लहान हवा. आता चित्र कशाचातरी आधार घेऊन उभं कर. चित्राच्या पुढे रिकामा ग्लास ठेव. पोहणारे मासे तुला दिसतील. आता ग्लास पाण्याने भर. आता काय दिसतंय?

पाण्याचा ग्लास चित्राला अगदी चिकटून ठेवला तर चित्र आहे तसंच दिसेल. आता ग्लास चित्रापासून थोडा पुढे-पुढे आण. एका ठराविक अंतरावर माशांची तोंड उलट्या दिशेला दिसतील. आहे की नाही गंमत!

अशी उलटी झाल्यावर मजेशीर दिसणारी दुसरी कुठली चित्रं तुला काढायला आवडतील? ती काढून त्यांचे फोटो आम्हाला नक्की पाठव.

RNI TC NO.: MAHBIL/2019/78568,
Declaration No.: SDM/Haveli/SR/59/2019
Date of Publication: 03/07/2023

